**पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक :- ०८/०२/२०२५

## नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे दर शनिवारी 'तक्रार निवारण' दिनाचे आयोजन महिनाभरात ३६२५ तक्रारी निकाली

---

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यामध्ये शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी ''क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा'' निश्चित केलेला असुन त्या धर्तीवर क्षेत्रीय शासकिय व निमशासकिय कार्यालयाकरीता आगामी १०० दिवसांमध्ये ०७ कलमी कृती आराखडा तयार करुन त्या मुद्दयांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे दि. १०/०१/२०२५ रोजी पासून आठवडयाचे दर शनिवारी 'तक्रार निवारण' दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर तक्रार निवारण दिनाचे अनुषंगाने नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे नाशिक ग्रामीण जिल्हयातील ०८ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये तसेच ४० पोलीस ठाणेनिहाय गत महिनाभरात एकुण ३६२५ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे ०८ उपविभागीय पोलीस कार्यालयांअंतर्गत ४० पोलीस ठाण्यांमध्ये वरिष्ठ अधिकारी यांनी भेटी देवुन पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या तक्रारीमधील फिर्यादी व तक्रारदार यांना पोलीस ठाणेस बोलावुन त्यांचे गुन्हा / तक्रारींच्या अनुषंगाने मार्गदर्शन व समुपदेशन केले. तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी देखील वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तक्रार निवारण दिनानिमित्त तक्रदारांच्या समस्या जाणुन घेवुन त्यांचे तक्रारींचे निरसन केले आहेत.

क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडयाचे कामकाज सुरु झाल्यापासुन दि. १८/०१/२०२५ राबविलेल्या पहिल्या तक्रार निवारण दिनाअंतर्गत १३८२ तक्रारी अर्ज, दुस-या तक्रार निवारण दिन शनिवार दि. २५/०१/२०२५ रोजी राबवुन त्यात ७६० तक्रारी अर्ज, तिसरा तक्रार निवारण दिन शनिवार दि. ०१/०२/२०२५ रोजी राबवुन ९२० तक्रारी अर्ज व आज रोजी चौथ्या तक्रार निवारण दिनानिमित्त ५६३ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहे. अशा पध्दतीने गेल्या महिनाभरात मिळुन **एकुण ३६२५ तक्रारी निकाली** काढण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने काही तक्रारींसंदर्भात दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही सुरु असून, काही तक्रारी दिवाणी स्वरुपाच्या असल्याने महसुल विभाग / दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास्तव तक्रारदारांना समज देण्यात आली आहे.